पुढारी

# मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स कोल्हापूरच्या मराठी विभागाच्यावतीने मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला आहे. ५ सप्टेंबर ते ५ ऑक्टोंबर या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते ८ यावेळेत या अभ्यासक्रमाचे वर्ग होणार आहेत. किमान दहावी उत्तीर्णांना यात प्रवेश घेता येईल. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने होणाऱ्या या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे व प्राचार्य डॉ. एस.जे. फराकटे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# बेरोजगारीसह आर्थिक विषमतेमुळेच मंदी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

देशावर मंदीचे सावट आहे. आर्थिक मंदीमुळे देशातील अनेक उद्योग अडचणीत आले आहेत. मोठमोठ्या कंपन्यांनी कामगार कपातीचा निर्णय घेतल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर मंदी व त्याचे परिणाम याबाबत शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग व बँक ऑफ इंडिया यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'रिसेशन इन इंडिया' या विषयावर सखोल चर्चा झाली.

## 'रिसेशन इन इंडिया' परिसंवादातील सूर



डॉ. महादेश देशमुख यांनी प्रास्ताविक केले. यावेळी अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी, बँक ऑफ इंडियाचे अधिकारी उपस्थित होते.

'देशातील वाढती बेरोजगारी व आर्थिक विषमता हेच आर्थिक मंदीचे लक्षण आहे. अन्य देशांच्या तुलनेत आपल्या देशाची उत्पादकता कमी आहे. सध्या आर्थिक व्यवस्थेत प्रचंड अस्थिरता आहे. गेल्या पाच वर्षात तीन वेळा गव्हर्नर बदलले. निती आयोगाच्या उपाध्यक्षपदी तीन वेळा अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली. याचाही फटका आर्थिक घडी विस्कळीत होण्यावर झाला आहे. आरोग्य व शिक्षण यावर अपेक्षित असलेला खर्च होत नसल्याचाही परिणाम मंदीतील एक घटक आहे.

– डॉ. जे. एफ. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

अर्थनिरक्षरता अधिक असल्यानेही मंदीचे सावट गडद झाले आहे. मंदीचे परिणाम सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनापासून लांब असले तरी त्यांचा अप्रत्यक्ष परिणाम हा समाजजीवनावर होत असतो. यापूर्वीच्या सरकारचे धोरण एकांगी होते, मात्र सत्ताधारी सरकारचे धोरण संभ्रमावस्था निर्माण करणारे आहे. येत्या काळात रिझर्व्ह बँकेची स्वायतत्ता संपण्याच्या कक्षेत आहे, त्यामुळे मंदीचे गांभीर्य अधिक व्यापक होण्याची गरज आहे.

– डॉ. विजय काकडे, अर्थशास्त्र अभ्यासक

बँकांकडे कर्जासाठी उद्योग, व्यापार सर्वच क्षेत्रांतून कर्जाची मागणी आहे. त्यामुळे थेट मंदी आहे असे म्हणता येणार नाही. पण अर्थव्यवस्था कठीण काळातून जात आहे हे नक्की. यासाठी गुंतवणूक हा पर्याय असू शकतो. विशेष पॅकेज किंवा कर्जमाफी या पर्यायांचा विचार योग्य नाही. कर्जमाफीमुळे बँकिंग क्षेत्रातील शिस्त बिघडते.

– नितीन देशपांडे, विभागीय व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया

# पोर्तुगीज प्रतिनिधींची आज विद्यापीठास भेट

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यापीठात विदेशी भाषा विभागातील पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटनानिमित्त गोव्यातील पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी व गोवा विद्यापीठातील पोर्तुगीज भाषा विभागाचे प्रमुख डॉ. डेल्फीम कोरेड्या द सिल्वा हे विद्यापीठास दि. ३१ रोजी भेट देणार आहेत. दुपारी ३.३० वा. ते 'भारत - पोर्तुगाल संबंध, पोर्तुगीज भाषा व करिअर' विषयावर संवाद साधतील.

# ‘फिट इंडिया’त सामील व्हा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

कोल्हापूर टाइम्स टीम



शिवाजी विद्यापीठात ‘फिट इंडिया’ चळवळीच्या प्रारंभानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीत सहभागी झालेले कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने आदी.

‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार शिवाजी विद्यापीठाशी संबंधित प्रत्येक घटकाने ‘फिट इंडिया’ चळवळीत सहभागी होऊन स्वतःच्या आरोग्य रक्षणाबरोबरच देशाच्या आरोग्याचेही संवर्धन करावे’, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये ‘फिट इंडिया मूव्हमेंट’ चा प्रारंभ केला. या कार्यक्रमाचे तसेच पंतप्रधान मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात गुरूवारी सकाळी करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ कॅम्पसमध्ये काढण्यात आलेल्या रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

प्रक्षेपणप्रसंगी ‘फिट इंडिया’ चळवळीचे जनआंदोलनात रुपांतर होण्याची गरज आहे. खेळामुळे शरीराची तंदुरुस्ती राहते, हे खरेच असले तरी, फिटनेसचा विस्तार आता खेळांच्याही पुढे जाऊन करण्याची गरज आहे. ‘बॉडी फिट तो माईंड हिट’, ‘मैं फिट तो इंडिया फिट’ किंवा ‘देअर आर नो एलिव्हेटर्स टू सक्सेस, यू हॅव टू टेक स्टेअर्स’ अशा पंतप्रधानांच्या आवाहनास विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा जोरदार प्रतिसाद लाभला.

यावेळी विद्यापीठ परिसरात फिट इंडिया ही रॅली काढण्यात आली. यामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह एक हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले.

लोकमत

## २० टन कचरा उठाव : पूरबाधित अकरा गावांत सोमवारपासून राबविली स्वच्छता मोहीम

# विद्यापीठाकडून पंचगंगा घाट परिसर स्वच्छ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) ७५० स्वयंसेवकांनी शुक्रवारी पंचगंगा घाट परिसर स्वच्छ केला. दिवसभरात सुमारे २० टन कचरा साफ केला. महापुराच्या पाण्याने काठावर आणून टाकलेल्या कचऱ्याचा उठाव झाल्याने घाटाचा परिसर चकाचक झाला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या उपस्थितीत सकाळी नऊ वाजता या मोहिमेचे उद्घाटन झाले. मोहिमेत सातारा



**कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पंचगंगा घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. यात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. के. गायकवाड, आदी सहभागी झाले.**

जिल्ह्यातील स्वयंसेवकांसह स्थानिक अशा सुमारे ७५० स्वयंसेवकांनी ४० कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला. राजाराम बंधारा, पंचगंगा स्मशानभूमी परिसरातून सात टन कचऱ्याचा उठाव केला. शहरातून घाटाकडे येणाऱ्या गंगावेश ते शिवाजी पूल रस्त्यासह पाणंद रस्ता, तोरस्कर चौक या ठिकाणी स्वच्छता केली. येथून सुमारे दोन टन प्लास्टिक कचऱ्याचा उठाव केला. स्वयंसेवकांनी २६ ऑगस्टपासून कोल्हापूर शहरासह शिरोळ तालुक्यातील पूरबाधित ११ गावांत स्वच्छता मोहीम राबवली.

# आयएसओ मानांकनासाठी पाहणी पूर्ण

कोल्हापूर : नॅक समितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शिवाजी विद्यापीठाला आयएसओ मानांकनासाठी आवश्यक असलेल्या निकषांची पाहणी प्रक्रिया शुक्रवारी पूर्ण झाली. टीव्हू सुद या जर्मन कंपनीच्यावतीने या मानांकनासाठी त्रयस्थ यंत्रणेद्वारे ही पाहणी केली. नॅकच्या तत्त्वानुसार आयएसओ मानांकन मिळवण्याच्या सूचना विद्यापीठ प्रशासनाला करण्यात आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर या समितीचा निर्णय निर्णायक ठरणार आहे. आयएसओ मानांकन मिळाल्यास नोव्हेंबर २०१९ मध्ये शिवाजी विद्यापीठात येणाऱ्या नॅक समितीच्या पाहणीदरम्यान या मानांकनाचा फायदा होणार आहे.

शुक्रवारी पाहणी पूर्ण झाली असून अद्याप समितीने अधिकृत निर्णय जाहीर केलेला नाही. या पाहणीमध्ये विद्यापीठाचे सर्व डाक्युमेंटस, इफेक्टिव्हनेस व इफिशिएन्सी या दोन गोष्टी तपासण्यात आल्या.

पुढारी

# दिवसभरात २० टन कचऱ्याचा उठाव

## विद्यापीठ एनएसएस विभागाची पंचगंगा परिसरात स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ७५० स्वयंसेवकांनी शुक्रवारी पंचगंगा घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. दिवसभरात सुमारे २० टन कचऱ्याचा उठाव केला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांच्या उपस्थितीत सकाळी पंचगंगा घाट परिसराच्या स्वच्छता मोहिमेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. मोहिमेत सातारा जिल्ह्यातून आलेल्या स्वयंसेवकांसह स्थानिक अशा ७५० स्वयंसेवकांनी ४० कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिम राबविली. पंचगंगा घाट परिसराबरोबरच राजाराम बंधारा, पंचगंगा स्मशानभूमी परिसरातही स्वच्छता करण्यात आली. त्या ठिकाणाहूनही सात टन कचऱ्याचा उठाव करण्यात आला. शहरातून घाटाकडे येणाऱ्या गंगावेश ते शिवाजी पूल रस्त्यासह पाणंद रस्ता, तोरस्कर चौक या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. दरम्यान, गेल्या दोन दिवसांत रंकाळा तलाव परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेअंतर्गत वीस टन कचरा उचलण्यात आला आहे. मोहिमेदरम्यान कोल्हापूर महानगरपालिकेसह जिल्हा प्रशासनाकडून सहकार्य लाभल्याचे डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.



**कोल्हापूर : पंचगंगा घाट स्वच्छता मोहिमेत सहभागी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व इतर. (छाया : नाज ट्रेनर)**

### पाच दिवसांत ११ गावांत मोहीम

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत २६ ऑगस्टपासून कोल्हापूर शहरासह शिरोळ तालुक्यातील पूरबाधित ११ गावांत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नृसिंहवाडी, अर्जुनवाड, औरवाड, राजापूर, खिद्रापूर, आलास, कवठेगुलंद, कनवाड, घालवाड अब्दुललाट गावांचा समावेश राहिला. मोहिमेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील १२०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

31 AUG 2019
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'फिट इंडिया' चळवळीत लोकांनी सहभागी व्हावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे आवाहन : विद्यापीठात 'फिट इंडिया' रॅली, पंतप्रधानांच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार शिवाजी विद्यापीठाशी संबंधित प्रत्येक घटकाने 'फिट इंडिया चळवळीत सहभागी होऊन स्वतःच्या आरोग्य रक्षणाबरोबरच देशाच्या आरोग्याचेही संवर्धन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये 'फिट इंडिया मूव्हमेंट' योजनेचा प्रारंभ केला.



या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आखवण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ कॅम्पसमध्ये काढण्यात आलेल्या रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

पंतप्रधान मोदी यांनी 'फिट इंडिया' चळवळीचे जनआंदोलनात रुपांतर होण्याची गरज असल्याचे सांगितले. खेळामुळे शरीराची तंदुरुस्ती राहते, हे खरे असले तरी, फिटनेसचा विस्तार आता खेळांच्याही पुढे जाऊन करण्याची गरज आहे. 'बॉडी फिट तो माईंड हिट', 'मैं फिट तो इंडिया फिट' किंवा 'देअरं आर नो एलिव्हेटर्स टू सक्सेस, यू हॅव टू टेक स्टेअर्स' अशा पंतप्रधानांच्या वनलायनर्सना विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा जोरदार प्रतिसाद लाभला. विशेषतः महाराष्ट्रातील लाठीकाठी, तलवार आणि दांडपट्टा फिरविण्याच्या प्रदर्शनाच्या वेळी तर विद्यार्थ्यांच्या उत्साहाला बहर आला. शिवाजी विद्यापीठ परिसरातून सुमारे पाच किलोमीटरची रॅली काढण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचगंगा घाट झाला चकाचक

## शिवाजी विद्यापीठाच्या एनएसएसच्या ७५० स्वयंसेवकांची स्वच्छता मोहीम

सकाळ वृत्तसेवा

**रमणमळा, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ७५० स्वयंसेवकांनी पंचगंगा घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविताना दिवसभरात सुमारे २० टन कचरा साफ केला. महापुराच्या पाण्याने काठावर आणून टाकलेल्या कचऱ्याचा उठाव झाल्याने काही तासांतच घाटाचा परिसर चकाचक झाला.**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वतः हातात खोरे घेऊन एनएसएस स्वयंसेवकांच्या साथीने स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. मोहिमेमध्ये ७५० स्वयंसेवकांनी ४० कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला.

प्लास्टिक साहित्य, झाडेझुडपे, काचेच्या बाटल्या, तसबिरी, तुटक्या-फुटक्या मूर्ती, नदीला अर्पण केलेले नारळ, गाळ-चिखल आदी प्रकारच्या मलब्याची स्वच्छता करण्यात आली. शहरातून घाटाकडे येणाऱ्या गंगावेस ते शिवाजी पूल रस्त्यासह पाणंद रस्ता, तोरस्कर चौक येथेही स्वच्छता करण्यात आली. या परिसरातूनही सुमारे दोन टन प्लास्टिक कचऱ्याचा उठाव करण्यात आला.

दरम्यान, गेल्या दोन दिवसांत रंकाळा तलाव परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेअंतर्गतही सुमारे वीस टन कचरा उचलला आहे. या सर्व मोहिमांदरम्यान महापालिकेसह जिल्हा प्रशासनाकडूनही मोठे सहकार्य लाभल्याचे डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले. मोहिमेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ८०० विद्यार्थी आणि ४०० विद्यार्थिनी अशा सुमारे १२०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध पूरग्रस्त ठिकाणीही नजीकच्या महाविद्यालयातील एनएसएसच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबविली. स्वच्छतेबरोबरच सर्वेक्षण आणि समुपदेशनाचे कार्यही या स्वयंसेवकांनी केले, अशी माहिती समन्वयक डॉ. गायकवाड यांनी दिली.



पंचगंगा घाट परिसराची स्वच्छता करताना एनएसएसचे स्वयंसेवक.

### शहर परिसरासह ११ गावांत मोहीम

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत २६ ऑगस्टपासून कोल्हापूर शहरासह शिरोळ तालुक्यातील पूरबाधित ११ गावांत स्वच्छता मोहीम राबविली. त्यामध्ये नृसिंहवाडी, अर्जुनवाड, औरवाड, राजापूर, खिद्रापूर, आलास, कवठेगुलंद, कनवाड, घालवाड, गणेशवाडी, अब्दुललाटचा समावेश राहिला.

# सातारा विद्यार्थ्यांकडून बावड्यात स्वच्छता

## मोहिमेतून चार ट्रॉली कचरा संकलित ; राजाराम बंधारा परिसरही झाला चकाचक

कसबा बावडा, ता. ३० : महापुरामुळे दुर्गंधी पसरलेल्या आणि कचऱ्याचा ढीग झालेल्या राजाराम बंधारा परिसरात सातारा येथील चार महाविद्यालयांतील एनएसएसच्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत ११७ विद्यार्थी सहभागी झाले होते. मोहिमेतून चार ट्रॉली कचरा संकलित करण्यात आला.

कोल्हापूर जिल्ह्याला या वर्षी महापुराचा मोठा तडाखा बसला. नदीकाठच्या अनेक वाड्या-वस्त्यांत पुराचे पाणी घुसून मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात स्वच्छता मोहीम राबवण्याचे आवाहन केले होते. विद्यापीठाच्या या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सातारा जिल्ह्यातील श्रीपतराव कदम महाविद्यालय-शिरवळ, सुशीला शंकरराव गाढवे महाविद्यालय-खंडाळा, शंकरराव जगताप आर्टस-वाघोली व आर्टस् कॉमर्स महाविद्यालय-सातारा या चार महाविद्यालयांतील ११७ विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक या मोहिमेत सहभागी झाले होते.

खोरी, घमेली, पाट्यांसह सकाळी नऊ वाजता हे विद्यार्थी राजाराम बंधाऱ्यावर दाखल झाले. महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत त्यांना मास्क व ग्लोव्हज देण्यात आले. दुपारी दोनपर्यंत या विद्यार्थ्यांनी राजाराम बंधारा व परिसर चकाचक केला.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडील कसबा बावड्याचे निरीक्षक नंदकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम झाली. त्यांना सामाजिक कार्यकर्ते अभिजित जाधव यांचे सहकार्य मिळाले. गोळा झालेला कचरा झूम प्रकल्पाकडे पाठवून या परिसरात औषध फवारणी करण्यात आली.



**कसबा बावडा : येथील राजाराम बंधारा परिसरात स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक.**

# आयएसओ मानांकनासाठी शिवाजी विद्यापीठाची तयारी

## निकषांच्या पूर्ततेसाठी जर्मनीच्या कंपनीकडून पाहणी

**कोल्हापूर, ता. ३० :** शिवाजी विद्यापीठाला आयएसओ मानांकन मिळविण्यासाठी तयारी सुरू आहे. मानांकनाचे निकष विद्यापीठाने कितपत पूर्ण केले आहेत, आणखी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, याची पाहणी टीव्हू सूद या जर्मनी कंपनीने आज पूर्ण केली.

आयएसओ मानांकन मिळाल्यास नोव्हेंबर २०१९ मध्ये शिवाजी विद्यापीठात येणाऱ्या नॅक समितीच्या पाहणीदरम्यान या मानांकनाचा फायदा होणार आहे. आयएसओ मानांकनासाठी असलेल्या निकषांच्या कक्षेत शिवाजी विद्यापीठ येते का, हे पाहण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून चार सदस्यीय समितीने पाहणी केली. काल ही पाहणी पूर्ण झाली असून अद्याप समितीने अधिकृत निर्णय जाहीर केलेला नाही. या पाहणीमध्ये विद्यापीठाचे सर्व डाक्युमेंटस्, इफेक्टिव्हनेस व इफिशिएन्सी या दोन गोष्टी सखोलपणे तपासल्या. शिवाजी विद्यापीठाला सध्या नॅकचा 'अ' दर्जा आहे. अकृषी विद्यापीठाच्या



रँकमध्येही विद्यापीठ अव्वल आहे. एनआयआरएफच्या क्रमवारीत दोन वर्षांपूर्वी विद्यापीठाचा २८ वा क्रमांक होता. दोन वर्षांपासून आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विशेष तयारी सुरू होती. तसेच नॅक समितीनेही आयएसओ मानांकन मिळवण्याच्या सूचना विद्यापीठाला केल्या होत्या.

### दृष्टिक्षेपात

- चार सदस्यीय समितीकडून पाहणी
- डाक्युमेंटस्, इफेक्टिव्हनेस, इफिशिएन्सीची तपासणी
- सध्या नॅकचा 'अ' दर्जा
- अकृषी विद्यापीठाच्या रँकमध्येही अव्वल

लोकमत

# विद्यापीठात आज संवाद कार्यक्रम



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागात पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु होत आहे. याच्या उद्‌घाटनानिमित्त गोव्यातील पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी डॉ. डेल्फीम कोरेइया द सिल्वा हे विद्यापीठास भेट देणार आहेत. आज, शनिवारी दुपारी साडेतीन वाजता त्यांच्याशी संवाद कार्यक्रम आयोजित केला आहे.

डॉ. डेल्फीम कोरेइया द सिल्वा हे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतील. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के , अधिष्ठाता डॉ. भारती पाटील उपस्थित असतील अशी माहिती विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी शुक्रवारी दिली.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाची ‘आयएसओ’साठी पाहणी

## चारसदस्यीय समितीच्या विविध विभागांना भेटी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ‘नॅक’ मूल्यांकनाची शिवाजी विद्यापीठाकडून तयारी सुरु आहे. त्याअंतर्गत विद्यापीठातील विविध सुविधा, पद्धती यांचे प्रमाणीकरण करून ‘आयएसओ ९००१ : २०१५’ मानांकन प्रमाणपत्र मिळविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यासाठी चार सदस्यीय समितीने विद्यापीठातील अधिविभाग आणि प्रशासकीय विभागांची गुरुवारी आणि शुक्रवारी पाहणी केली. टीयुव्ही सूद साउथ एशिया प्रायव्हेट लिमिटेड या जर्मन कंपनीची चारसदस्यीय समिती विद्यापीठात गुरुवारी दाखल झाली. लीडरशिप ऑडिट अंतर्गत या समितीने कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, तंत्रज्ञान, नॅनो टेक्नॉलॉजी, मराठी, राज्यशास्त्र, संगणकशास्त्र, आदी अधिविभागांची पाहणी केली. समितीने शुक्रवारी वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, संगणक केंद्र, डाटा सेंटर, प्रशासनातील संलग्नता विभागांना भेट दिली. सायंकाळी एक्झिट मीटिंग झाली. समितीकडून पाहणीचा निकाल, सूचना १० दिवसांत मिळणे अपेक्षित आहे, असे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.

> विद्यापीठातील शिक्षण पद्धती, प्रशासकीय कामकाज, निकाल लावण्याची प्रक्रिया, ग्रंथालयातील सेवा, आदींबाबत समितीने यावेळी काही सूचना केल्या आहेत.
>
> - डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव